## <u>वृक्षतोड परवानगी</u>

अनेक वेळा महसूल खात्यातील तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांच्याकडे वृक्षतोड परवानगी मागितली जाते. वृक्षतोड परवानगीबाबत वन कायद्यांत काय तरतुद आहे याबाबत यालेखात माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि निरोगी पर्यावरण निर्मितीसाठी देशात ३३% भूभाग वनाखाली असावा असे निसर्गतज्ज्ञ सांगतात. आज रोजी फक्त २०% भूभाग वनाखाली आहे. त्यामुळे वन वाढविणे आणि त्यांचे संरक्षण करणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. याबाबतीत शासकीय यंत्रणा म्हणून वन विभाग आणि महसूल विभाग यांची भूमिका महत्वाची आहे. वन हा समवर्ती सूची सुचीतील विषय आहे.

महाराष्ट्र राज्यात "महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४" हा मूळ कायदा लागू होतो. या अधिनियमातील तरतुदी, मुख्यत: प्रतिबंधीत (जी झाडे कापण्यास प्रतिबंध केला आहे) झाडांच्या अनुसूचीत समाविष्ट झाडांसाठी लागू आहे. मुख्यत: वृक्षतोड परवानगीबाबत चर्चा करतांना उपरोक्त मूळ कायद्यासह, दिनांक २० डिसेंबर २००५ रोजी शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला <u>"महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) (सुधारणा) नियम २००५"</u> चा विचार करणे आवश्यक आहे.

☞ खालील सोळा झाडे अनुसूचीत करून, ती तोडण्यास शासनाने प्रतिबंध केला आहे.
१. हिरडा २. साग ३. मोह ४. चिंच ५. आंबा ६. जांभूळ ७. खैर ८. चंदन ९. तिवस १०. अंजन
११. किंजळ १२. फणस १३. हळदू १४. बीजा १५. ऐन १६. मॅन्ग्रोव्ह.
उपरोक्त अनुसूचीत झाडे तोडण्यास वन विभागाकडून परवानगी दिली जाते. महाराष्ट्र राज्यात अनुसूचीत झाडे तोडण्याची परवानगी देण्याचे अधिकार 'वन अधिकारी' यांचेकडे आहेत.

"महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४" अन्वये खालील प्रमाणे तरतुद आहे.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील विवक्षित झाडांचे जतन करण्यासाठी आणि जमिनीची धूप होऊ नये म्हणून तिचे संरक्षण करण्यासाठी अशी झाडे तोडण्याचे विनियमन करण्याकरिता अधिक चांगली तरतूद करणे आणि तत्संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** आता, भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास ' **महाराष्ट्र** झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ ' असे म्हणावे.

(२) तो नागरी क्षेत्र वगळून संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होतो.

२. या अधिनियमात, अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

[२][ (क-१) '' कृत्रिम रोपण '' याचा अर्थ, शासनाची मालमत्ता नसलेल्या कोणत्याही जमिनीवर कृत्रिम साधनांद्वारे किंवा माणसांकडून प्रतिहेक्टरी, झाडांच्या किमान १०० बीज रोपांचे रोपण करणे, असा आहे; ]

[३][ (क) '' अधिनियम '' याचा अर्थ, ' महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ', असा आहे; ]

[३][ (ख) ] '' जिल्हाधिकारी '' या संज्ञेत, राज्य शासनाने या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व कामे पार पाडण्यासाठी नेमलेल्या महसूल अधिकाऱ्याचा समावेश होतो;

[३][ (ग) ] '' वन अधिकारी '' याचा अर्थ, भारतीय वन अधिनियम, १९२७ याच्या अर्थानुसार असलेला वन अधिकारी, असा आहे;

(घ) '' महसूल अधिकारी '' याचा अर्थ, [१] [जमीन महसूल अधिनियमाच्या] अर्थानुसार असलेला महसूल अधिकारी, असा आहे;

(ङ.) '' झाड तोडणे '' यामध्ये झाडास अतीव नुकसान पोहोचविण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळून टाकणे किंवा कापणे किंवा छाटणे या गोष्टींचा समावेश होतो;

(च) '' झाड '' याचा अर्थ, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले कोणतेही झाड; आणि राज्य शासनाला कोणत्याही प्रकारच्या झाडाचे संरक्षण करण्याच्या आवश्यकतेचा विचार केल्यानंतर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अनुसूचीत भर घालता येईल किंवा फेरबदल करता येईल ; आणि कलम १५ च्या पोट-कलमं (२) च्या तरतुदी या जेथवर विधानमंडळापुढे ठेवण्याशी आणि त्याच्याकडून फेरबदल केले जाण्याशी संबंधित असतील तेथवर त्या, त्या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या अशा अधिसूचनेच्या संबंधात लागू होतील ;

वरील तरतुदींतील कलम २(च) वाचता असे लक्षात येते की, या अधिनियमातील तरतुदी, प्रतिबंधीत (जी झाडे कापण्यास प्रतिबंध केला आहे) झाडांच्या अनुसूचीत समाविष्ट झाडांसाठी लागू आहे.

[२][ (च च) ''वृक्ष अधिकारी'' याचा अर्थ, वनक्षेत्रपालाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला 'वन अधिकारी,' असा आहे ;]

(छ) ''नागरी क्षेत्र'' याचा अर्थ, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपालिका समिती, नगर समिती किंवा त्या त्या वेळे पुरता अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये घटित केलेली अधिसूचित क्षेत्र समिती किंवा कटक याच्या हद्दीतील क्षेत्र असा आहे; आणि त्यात पाच हजारपेक्षा कमी लोकसंख्या नसणाऱ्या आणि तीन-चतुर्थांशपेक्षा कमी पुरुष कामगार बिगरशेतकी धंद्यामध्ये गुंतलेले नसणाऱ्या, राज्य शासनाने राजपत्रामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा स्थानिक क्षेत्राचा समावेश होतो;

उपरोक्त पोटकलम (च) नंतर, सन १९८९ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ अन्वये (च)(च) अन्वये 'वृक्ष अधिकारी' या वन अधिकाऱ्याचा समावेश करण्यात आला आहे.

३. (१) कोणतीही रुढी, परिपाठ किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला कोणताही कायदा अथवा कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश असला तरी किंवा कोणत्याही संलेखात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने रीतसर अधिकार दिलेल्या [४] [वृक्ष अधिकाऱ्याच्या] लेखी पूर्वपरवानगीशिवाय [५] * * * * * कोणतीही व्यक्ती स्वतःच्या मालकीच्या किंवा इतर कोणत्याही जमिनीतील कोणतेही झाड तोडणार नाही किंवा असे झाड तोडावयास लावणार नाही. [५] * * * * *

[६][ (१-क) कोणत्याही व्यक्तीची एखादे झाड तोडण्याची इच्छा असेल तर, ती त्यासंबंधात

परवानगी मिळण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या [१][वृक्ष अधिकाऱ्याकडे] लेखी अर्ज करील.

(१-ख) अर्ज मिळाल्यावर [१] [वृक्ष अधिकारी]---

(क) त्या अर्जाची सात दिवसांच्या आत पोच देईल ;

(ख) योग्य ती चौकशी केल्यानंतर, कलम १५ अन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअनुसार मागितलेली परवानगी, त्यास देता येईल किंवा नाकारता येईल :

परंतु, जर एखादे झाड निर्जीव झाले असेल, रोगट झाले असेल किंवा वाऱ्याने पडले असेल, किंवा वनसंवर्धनाच्या दृष्टीने पूर्णतावस्थेला पोहोचले असेल, [२] [किंवा त्यामुळे वाहतुकीला अडथळा होत असेल, किंवा आग, वीज, पाऊस किंवा अन्य नैसर्गिक कारणांमुळे त्याची मोठ्या प्रमाणावर हानी झाली असेल किंवा ते नष्ट झाले असेल, ] किंवा कार्यक्षमरीत्या लागवड करण्यास त्यामुळे अडथळा होत असेल तर, अशी कोणतीही परवानगी नाकारणार नाही :

[३] [ परंतु आणखी असे की, अर्जदार, वृक्ष अधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे, तेवढीच संख्या असलेली, त्याच किंवा अन्य जातीची झाडे त्याच जागी किंवा त्या परिसरातील अन्य सुयोग्य जागी लावील, या शर्तीस अधीन राहून अशी परवानगी देता येईल.]

[४] [ (१-ख क ) पोट-कलम (१-ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, यासंबंधात कलम १५ अन्वये केलेल्या नियमांना अधीन राहून, वृक्ष अधिकारी, कृत्रिम रोपणात इष्टतम वाढ होण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने झाडांची छाटणी किंवा तोड करणे यासारखी वृक्षसंवर्धनविषयक कामे करण्याकरिता पोट-कलम (१-क) अन्वये करण्यात आलेला अर्ज नाकारणार नाही.]

उपरोक्त पोटकलम ३ (१-क) अन्वये, अनुसूचीत समाविष्ट असलेले वृक्ष तोडण्याच्या परवानगीसाठी "वृक्ष अधिकाऱ्याकडे" लेखी अर्ज करायचा आहे.

अनुसूचीत समाविष्ट असलेले वृक्ष तोडण्याच्या परवानगी देण्याचे अधिकार महसूल अधिकाऱ्यांना नाहीत.

महसूल अधिकारी, (१) महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादी बाबतीतील अधिकारांचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७,

(२) महाराष्ट्र जमीन महसूल (लाकूड तोड व लाकडाचा पुरवठा इत्यादीचे नियमन) नियम १९७०,

(३) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी झाडे, झाडांचे उत्पन्न, चराई व इतर नैसर्गिक उत्पादने यांची व्यवस्था) नियम, १९६९

या नियमांखाली झाडांशी संबंधीत कार्यवाही करतात.

"महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४" च्या कलम ५ अन्वये, महसूल व पोलीस विभागातील अधिकाऱ्यांनी अवैध वृक्ष तोडी विरूध्द कारवाई करण्याची तरतुद आहे. ती खालील प्रमाणे:

**५.** (१) प्रत्येक महसूल अधिकाऱ्याने, वन अधिकाऱ्याने आणि पोलीस अधिकाऱ्याने.–

(क) कलम ३ अन्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास त्या कलमाच्या कोणत्याही उल्लंघनाची आणि असे उल्लंघन करण्याच्या इराद्यांसंबंधी किंवा तयारीसंबंधी त्यास माहीत होईल अशी माहिती ताबडतोब देणे ;

(ख) जे उल्लंघन होण्याच्या बेतात आहे किंवा होण्याचा संभव आहे हे त्यास माहीत असेल किंवा तसे त्यास सकारण वाटत असेल, असे उल्लंघन होऊ नये म्हणून आपल्या अधिकाराच्या कक्षेतील योग्य ती सर्व उपाययोजना करणे ;

त्यास बंधनकारक असेल.

Sanjay Kundetkar D.

(२) कलम ३ चे उल्लंघन करून एखाद्या जमिनीवरील एखादे झाड तोडले आहे किंवा तोडले जात आहे असे अव्वल कारकून किंवा नायब तहसिलदार याच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जा नसलेला कोणताही महसूल अधिकारी, वन क्षेत्रपालाच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जा नसलेला वन अधिकारी किंवा फौजदाराच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जा नसलेला पोलीस अधिकारी यास सकारण वाटत असेल त्या बाबतीत, त्यास कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल आणि असे तोडलेले झाड किंवा त्याचे कोणतेही तुकडे व त्याचे उत्पन्न आणि असे उल्लंघन करताना उपयोगात आणलेली हत्यारे, नावा, [१] [वाहने व वाहतुकीची इतर साधने] ताब्यात घेता येतील, अशा मालमत्तेवर ती मालमत्ता अशा रीतीने ताब्यात घेण्यात आल्याचे दर्शविणारी खूण करता येईल आणि तो अशा रीतीने त्या वस्तू ताब्यात घेतल्यासंबंधी कलम ३ अन्वये [१][अधिकार प्रदान केलेल्या वृक्ष अधिकाऱ्यास] कळवील.

(३) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये कोणतीही मालमत्ता ताब्यात घेण्यात आली असेल तव्हा, तो ताब्यात घेणारा अधिकारी, मालमत्ता स्वतःच्या अभिरक्षेत किंवा आपल्या हाताखालील कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेत ठेवील, आणि तो त्या मालमत्तेच्या योग्य अभिरक्षेबद्दल जबाबदार असेल :

परंतु, ताब्यात घेण्यात आलेली मालमत्ता ही त्वरित व स्वाभाविकरीत्या नाश पावणारी असेल किंवा ती अभिरक्षेत ठेवण्याचा खर्च तिच्या किंमतीपेक्षा अधिक होण्याचा संभव असेल त्या बाबतीत, ती ताब्यात घेणाऱ्या अधिकाऱ्यास ती मालमत्ता ताबडतोब विकता येईल :

परंतु आणखी असे की, अशी मालमत्ता सोईस्करपणे दुसरीकडे नेणे शक्य नसल्यास त्या बाबतीत अशी मालमत्ता ताब्यात घेणाऱ्या अधिकाऱ्यास, अशा मालमत्तेत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीच्या सांगण्यावरून, ती मालमत्ता, ज्या ठिकाणी ताब्यात घेण्यात आली असेल त्या ठिकाणी, तिच्यामध्ये हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीच्या किंवा जी अशी मालमत्ता ठेवून घेण्याचे पत्करील अशा कोणत्याही प्रतिष्ठित व्यक्तीच्या ताब्यात ठेवता येईल. मात्र तत्पूर्वी अशी व्यक्ती दोन किंवा अधिक जामीनदार देऊन ती अशा मालमत्तेची योग्य काळजी घेईल आणि मागणी करण्यात आली असता ती अशी मालमत्ता हजर करील अशा आशयाचे त्या मालमत्तेच्या किंमतीपेक्षा कमी नसेल एवढ्या रकमेचे बंधपत्र करून देईल.

(४) अशा रीतीने ताब्यात घेण्यात आलेली मालमत्ता, कलम ४ अन्वये राज्य शासनाकडे सरकारजमा करण्याविषयी आदेश देण्यात आला नसेल तर, अशी मालमत्ता ज्या व्यक्तीकडून ताब्यात घेतली असेल त्या व्यक्तीस परत करण्यात येईल.

(५) उपरोक्त रीतीने जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेच्या संबंधात त्रयस्थाने कोणत्याही प्रकारचा दावा सांगितला असेल तर, कलम ३ अन्वये अधिकार दिलेला [१][वृक्ष अधिकारी] त्या दाव्यासंबंधी चौकशी करील आणि त्या दाव्यासंबंधी अशा व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्यास असा दावा मंजूर करता येईल किंवा नामंजर करता येईल.

म्हणजेच अवैध वृक्ष (अनुसूचीतील) तोडीविरूध्द वरील प्रमाणे कारवाई केल्यानंतर त्याबाबत अंतिम निर्णय "वृक्ष अधिकाऱ्याने" घ्यावयाचा आहे.

१०. या अधिनियमान्वये कोणत्याही [१] [वृक्ष अधिकाऱ्याने] किंवा राज्य शासनाने जी कोणतीही रक्कम भरण्याविषयी निदेश दिला असेल अशी रक्कम, ती भरण्याविषयी जिला आदेश दिला असेल त्या व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

११. या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असणाऱ्या कोणत्याही कृत्याबद्दल, राज्य शासनाविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये अधिकारांचा वापर करण्यास किंवा कर्तव्य पार पाडण्यास किंवा कामे पार पाडण्यास अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा कार्यवाही करता येणार नाही.

"महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) (सुधारणा) नियम २००५" दिनांक १९/१२/२००५ अन्वये, "महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) नियम १९६७" मध्ये 'महसूल अधिकारी' च्या ऐवजी 'वृक्ष अधिकारी' असे दाखल करणे तसेच वृक्षतोडीचे परवानगी विषयक अर्ज हे "वृक्ष अधिकारी" यांना उद्देशुन लिहिलेले असावे अशी सुधारणा करण्यात आली.

1. These rules may be called the Maharashtra Felling of Trees (Regulation) (Amendment) Rules, 2005.

2. Throughout the Maharashtra Felling of Trees (Regulation) Rules, 1967 (hereinafter referred to as "the principal rules"), including the Forms appended thereto, for the words "Revenue Officer" the words "Tree Officer" shall be substituted.

झाड तोडल्यानंतर शेतकरी या झाडाचा उपयोग स्वत:साठी किंवा शेतीची अवजारे बनविण्यासाठी करु शकतो. परंतु तोडलेले झाड बाहेर न्यावयाचे असल्यास किंवा ते झाड अन्य व्यक्तीला विकण्याचे असल्यास त्या झाडाच्या लाकडाच्या वाहतूकीसाठी वनक्षेत्रपालाकडून वाहतूकीचा परवाना दिला जातो.

ooo◉ooo

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम २५ ते २८ अन्वये झाडासंबंधीच्या तरतुदी नमुद आहेत.

☛ कलम २५(१) अन्वये: कोणत्याही जमिनीवर असलेल्या आणि वाढणाऱ्या झाडांवरील हक्क हा जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीकडे असल्याचे मानले जाते. परंतु जमिनीची धुप होऊ नये म्हणून शासनास झाडतोड करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार आहे.

☛ कलम २६ अन्वये: महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, कलम २२ अन्वये जंगलांसाठी वेगळ्या राखून ठेवलेल्या जमिनींवर वाढणाऱ्या सर्व झाडे, झुडपे, जंगले किंवा इतर नैसर्गिक उत्पन्ने यांवर कलम २६ अन्वये राज्य शासनाचा हक्क असेल आणि राज्य शासन, त्याबाबत केलेल्या नियमांनुसार त्यांचे जतन करेल किंवा त्यांची विल्हेवाट लावेल.

☛ कलम २७ अन्वये: शासनाकडे निहित असलेली झाडे इत्यादी अनधिकृतपणे घेऊन जाणे हे शास्तीस पात्र असेल. अशा शास्तीची रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येते.

☛ कलम २८ अन्वये: राखीव जंगलांच्या बाहेर असलेल्या पडीत जमिनींवरील लाकूड सरपण, शेतीच्या अवजारांसाठी आवश्यक असतील अशी लाकडे इत्यादी, कोणताही कर न भरता गावकऱ्यांना घेता येते.

☛ **महाराष्ट्र जमीन महसूल (झाडॆ इत्यादींच्या बाबतीतील अधिकारांचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७** यानुसार,

१) कोणताही जलप्रवाह, झरा किंवा तलाव यांच्या किनाऱ्याच्या अंतिम कडेपासून तीस मीटर्सच्या आत असलेले कोणतेही झाड, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय तोडता येत नाही.



Dr. Sanjay Kundetkar. D. Collector

२) पोट-नियम (१) खाली येणार नाही अशा कोणत्याही प्रकरणी मशागतीस अयोग्य असेल अशी किंवा ज्या जमिनीमध्ये शेतीच्या पिकांची लागवड करणे किफायतशीर नसेल अशी जमीन, समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही धारण जमिनीतील किंवा तिच्या भागातील कोणतेही झाड, उक्त धारण जमिनीतील किंवा तिच्या भागातील वाढणाऱ्या झाडांचे प्रमाण, दर एकरी वीस झाडे या प्रमाणापेक्षा कमी असेल तर जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय तोडता येणार नाही.
३) या नियमाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, अशा उल्लंघनामुळे जे कोणतेही इतर परीणाम होतील त्या व्यतिरिक्त, आपले म्हणणे मांडण्याची तिला संधी दिल्यानंतर, जिल्हाधिकऱ्यास, योग्य वाटेल अशा एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण १ :** ह्या नियमांच्या प्रयोजनासाठी 'जलप्रवाह' यांमध्ये, ज्यात पावसाळ्यात किंवा अन्यथा पाणी साठते व प्राय: ज्यात डिसेंबर अखेरपर्यंत पाणी राहते असे सर्व ओढे, नद्या, ओहोळ  व नाले यांचा समावेश होतो, परंतु त्यात पावसाळ्यात पाणी वाहण्यामुळे तयार झालेल्या लहान तात्पुरत्या जलमार्गाचा समावेश होत नाही.
**स्पष्टीकरण २ :** कोणतेही झाड, कोणताही जलप्रवाह, झरा किंवा तलाव यांच्या किनाऱ्याच्या अंतिम कडेपासून तीस मीटर्सच्या आत आहे किंवा कसे किंवा कोणतीही धारण जमीन किंवा तीच भाग यामध्ये मशागतीस अयोग्य असलेल्या जमिनीचा किंवा शेतीच्या पिकांची किफायतशीर लागवड करणे शक्य नसेल अशा जमिनीचा अंतर्भाव आहे किंवा कसे, याबद्दल कोणतेही प्रश्न उपस्थित झाल्यास, तो प्रश्न जिल्हाधिकाऱ्यंकडे पाठविण्यात येईल.

**३)** सर्वसाधारणपणे खालील परिस्थितीत झाडे तोडण्यास जिल्हाधिकाऱ्यांमार्फत परवानगी दिली जाते.
(अ) झाड वाळून किंवा रोग पडून मृत किंवा वाऱ्यामुळे वाकून मोडले असल्यास,
(ब) झाडावर झाड येऊन किंवा अन्यथा झाडामुळे वाहतूकीस अडचण येत असल्यास
(क) वनीकरणाच्या दृष्टीने झाड पक्व झाले असल्यास, किंवा झाड वठलेले असल्यास,
(ड) आग, पाऊस किंवा नैसर्गिक कारणांमुळे झाडापासून जीवितास किंवा मालमत्तेस कोणतीही इजा किंवा नुकसान पोहोचण्याची शक्यता असल्यास,
(इ) नियमित अन्नधान्याच्या पिकांखालील लागवडीयोग्य जमिनीवर अशा झाडांची सावली पडल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात घट येत असेल आणि त्याबाबतीत झाडे काढून टाकणे हे जमीनधारकाच्या हिताचे ठरत असल्यास अशी झाडे तोडण्यास जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देता येईल.

☛ **महाराष्ट्र जमीन महसूल (लाकूड तोड व पुरवठा इत्यादीचे नियमन) नियम, १९७०**
यानुसार,
**२) पडीत जमिनीवर लाकडाच्या तोडीचे नियमन:**
(१) पोट-नियम (२) च्या उपबंधाना अधिन राहून कोणत्याही राखीव जंगलाबाहेरील कोणत्याही पडीत जमिनीत उभ्या असलेल्या झाडापासून सर्वसाधारणपणे गावातील रहिवाशांना जळणासाठी आणि शेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांसाठी आवश्यक असेल असे लाकूड कोणताही कर न देता घेता येईल.
(२) <u>उप-विभागीय अधिकाऱ्याच्या परवानगीखेरीज</u> पोट-नियम (१) च्या प्रयोजनासाठी पुढील झाडे तोडता येणार नाही किंवा त्यांच्या फांद्या छाटता येणार नाहीत
(अ) सावलीसाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली झाडे

Dr. Sanjay Kundetkar, Dy. Collector

(ब) रस्त्याच्या बाजूची झाडे, राईतील झाडे आणि छावणीच्या जागेभोवतालची म्हणून जिल्हाधिकाऱ्याने घोषित केली असतील अशी झाडे

(क) साग, शिसवीचे लाकूड, चंदनाचे लाकूड, तिवस, खैर, हिरडा आणि आंबा

(ड) कोणताही जलप्रवाह, झरा किंवा तलाव यांच्या काठापासून तीस मीटर अंतराच्या आतील झाडे

(इ) त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये जी झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली आहेत ती झाडे

(फ) जिल्हाधिकारी, संबंधित वनसंरक्षकांशी विचारविनिमय करुन वेळोवेळी अधिसूचित करील अशी इतर झाडे

(३) या नियमांचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती तोडलेल्या किंवा छाटलेल्या लाकडाच्या मूल्याच्या दोन पटीपेंक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या दंडास पात्र होईल.

**३) राखीव जंगलातील लाकडाच्या तोडीचे नियमन :**

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ अन्वये राखीव जंगलासाठी वेगळ्या राखून ठेवलेल्या जमिनीत उभ्या असलेल्या झाडांच्या बाबतीत आवश्यक ती चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकारी घरगुती किंवा इतर प्रयोजनासाठी जळणाचे किंवा इमारतीचे लाकूड तोडणाऱ्या गावकऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या विवक्षित वर्गाच्या विद्‌यमान विशेषधिकाराबद्‌दल खात्री करुन घेईल व त्याची नोंद करील.

(२) जिल्हाधिकाऱ्यास पोट-नियम (१) अन्वये नोंद केलेल्या विशेषाधिकाऱ्यांचा गावकऱ्यांना ज्या वेळी व ज्या रीतीने वापर करता येईल ती वेळ व ती रीत यासंबंधी वेळोवेळी ग्राम अधिकाऱ्यांना सूचना देता येतील, अशा सूचनांना गावात योग्य प्रसिध्दी देण्यात येईल.

(३) घरगुती किंवा इतर प्रयोजनासाठी सरपण किंवा लाकूड तोडण्यासंबंधीच्या गावकऱ्यांच्या किंवा इसमांच्या विवक्षित वर्गाच्या विशेषाधिकारास अधीन राहून, राखीव जंगलासाठी कलम २२ अन्वये जी जमीन वेगळी ठेवणयात आली असेल त्या जमिनीत. आणि ज्या बाबतीत कोणत्याही दुमाला जमिनीच्या संबंधात असे विशेषाधिकार अस्तित्वात असतील अशा इतर सर्व बाबतीत, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमाद्‌वारे उक्त विशेषाधिकारांच्या वापराचे नियमन करण्यात येईल. अशा कोणत्याही विशेषाधिकारांचा वापर करण्याची पध्दत आणि वेळ यासंबंधीच्या विवादाच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निर्णय या अधिनियमाच्या उपबंधानुसार केवळ एकच अपील करता येईल या गोष्टीस आधीन राहून, अंतिम असेल.

**☛ महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी झाडे, झाडांचे उत्पन्न, चराई व इतर नैसर्गिक उत्पादने यांची व्यवस्था) नियम, १९६९**

**३. शासनाच्या मालकीच्या झाडांची वासलात लावणे इत्यादी :**

(एक) राज्य शासनाच्या मालकीची कोणतीही झाडे कलम २६ अन्वये विकण्यात येतील त्याबाबतीत अशी विक्री जाहीर लिलावाद्‌वारे किंवा जिल्हाधिकारी वनसंरक्षकांशी विचारविनिमय करुन अन्यथा निर्देश देईल त्यानुसार करण्यात येईल.

(दोन) राज्य शासनाच्या मालकीची जमिनीवर वाढणारी खुरटी झाडे, लाख, मध, गोंद, राळ, कात व जंगलातील किंवा इतर तत्सम नैसर्गिक उत्पादन, यांची विक्री जिल्हाधिकाऱ्याने कलम २६ अन्वये जाहीर लिलावाने एकतर एक वर्षाच्या मुदतीकरीता किंवा पाच वर्षाहून अधिक नसेल अशा कोणत्याहा मुदतीकरिता करता येईल.

Dr. Sanjay Kundetkar, Dy. Collector

**४. चराईची व्यवस्था लावणे :** राज्य शासनामध्ये निहीत असलेल्या व भोगवट्यात नसलेल्या जमिनीच्या (मग अशा जमिनीला भू-मापन जमाबंदी लागू असो वा नसो आणि त्याच्यावर आकारणी करण्यात येत असो वा नसो) व केवळ गवताकरिता किंवा चराईकरिता विशेषरीत्या राखून ठेवलेल्या (कलम २२ अन्वये अभिहस्तांकित केलेली किंवा कलम १६१ अन्वये तयार केलेल्या निस्तार पत्रकात समावीष्ट केलेली जमीन वगळून) जमिनीतील चराईची वर्षावर्षास याप्रमाणे किंवा ५ वर्षाहून अधिक नसेल अशा कोणत्याही मुदतीकरिता जाहीर लिलावाने पट्टा देऊन किंवा अन्यथा, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस एकतर शेतामागून शेत याप्रमाणे किंवा लाग (गवतांचे पट्टे) देऊन व जिल्हाधिकारी ठरवील अशा वेळी पुढील अटींवर देता येईल :-

(एक) जमीन लागवडीखाली आणली जाता कामा नये.

(दोन) अशा व्यक्तीस जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने तो ठरवील अशी चराई फी आकारण्याचा हक्क असेल.

(तीन) गावाच्या प्रत्येक रहिवाशास किंवा शेतकऱ्यास, खंड (दोन) अन्वये निश्चित केलेली फी दिल्यानंतर अशा जमिनीवर गुरे चारण्याची परवानगी देण्यात येईल.

(चार) अशा व्यक्तीचा अशा जमिनीवर उभ्या असलेल्या झाडांवर व वन उत्पादनावर कोणताही अधिकार असणार नाही.

**५. अधिकार रद्द करणे:**

(१) नियम (४) अन्वये कोणत्याही व्यक्तीस प्रदान करण्यात आलेला अधिकार -

(एक) जर नियम (४) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही शर्तीचा त्यान्वये, त्या व्यक्तीने भंग केला, किंवा नियत तारखेस पट्ट्यांची रक्कम देण्यात कसूर केली किंवा

(दोन) त्या जमिनीवर गुरे चारविणाऱ्या व्यक्तीपैकी बहुसंख्य व्यक्तीची तशी इच्छा असेल तर रद्द करण्यात येईल.

(२) (अधिकार) रद्द करण्यासंबंधीचा आदेश अशा आदेशाच्या तारखेनंतर येणाऱ्या १ जूनपासून अंमलात येईल.

**६) चराईच्या भाडेपट्ट्याबद्द्ल कोणतीही मागणी करण्यात आली नसेल त्या वेळी अनुसरावयाची कार्यपध्दती**: जर नियम ४ अन्वये जमीन घेण्याची मागणी कोणीही केली नसेल किंवा संबंधित गावातील बहुसंख्य लोकांनी जमिनीची चराईकरिता जरुरी नाही असे जाहीर केले असेल तर, तहसिलदारास ती जमीन मशागतीसाठी उपलब्ध असलेली जमीन असल्याची नोंद करण्याचा निर्देश देता येईल.

**७) प्रत्यायोजन :** जिल्हाधिकाऱ्यास, या नियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचे जिल्हयातील उपविभागीय अधिकाऱ्यास व तहसिलदारास प्रत्यायोजन करता येईल.

वरील नियमांचे वाचन करता असे लक्षात येते की -

♦ (१) महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादी बाबतीतील अधिकारांचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७ च्या बाबतील अधिकार जिल्हाधिकारी यांचे आहेत.

Dr. Sanjay Kundetkar, Dy. Collector

♦ (२) महाराष्ट्र जमीन महसूल (लाकूड तोड व लाकडाचा पुरवठा इत्यादीचे नियमन) नियम १९७०, बाबतील काही अधिकार, उप-विभागीय अधिकाऱ्यांचे आहेत तर त्यातील **राखीव जंगलातील लाकडाच्या तोडीचे नियमन** करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांचे आहेत.

♦ (३) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी झाडे, झाडांचे उत्पन्न, चराई व इतर नैसर्गिक उत्पादने यांची व्यवस्था) नियम, १९६९ बाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांचे आहेत परंतु त्यांना या नियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यास व तहसिलदारास प्रत्यायोजन करता येते.

✓ आजच्या माहिती अधिकाराच्या युगात, जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी किंवा तहसिलदार यांना प्रत्यायोजीत (delegate) केलेल्या प्रत्येक अधिकाराचे पत्र व नोंद दप्तरात ठेवणे आवश्यक झाले आहे.

वनसंवर्धन शास्त्रानुसार कोणते झाड परिपक्व आहे, वठलेले आहे इत्यादी बाबतीत खात्री करून घेण्यासाठी महसूल अधिकारी यांनी वनविभागाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाशी योग्य समन्वय साधून चर्चा करावी, महसूल अधिकाऱ्यांनी झाडे पाडण्यासाठी परवानगी देण्यापूर्वी संबंधित वन अधिकाऱ्याशी चर्चा किंवा पत्रव्यवहार करण्याची दक्षता घ्यावी. तसेच पारीत केलेल्या आदेशांच्या प्रती त्यांच्याकडे अग्रेषित कराव्यात.
झाडे तोडण्याला परवानगी नाकारणाऱ्या आदेशांच्या प्रतीही महसूल अधिकाऱ्यांनी संबंधित वन अधिकाऱ्याकडे अग्रेषित कराव्यात.

झाडे तोडण्यासाठी परवानगी मागणाऱ्या शेतकऱ्यांना अनावश्यक त्रास सोसावा लागणार नाही याची दक्षता घ्यावी महसूल अधिकाऱ्यांनी केलेला कोणताही विलंब किंवा कसूर किंवा गुणवत्ता विचारात न घेता दिलेला आदेश किंवा निकालात काढलेला अर्ज यांची शासन गंभीर दखल घेते.

☛ **तलाठी यांची झाडांबाबतची कर्तव्ये:**

- अभिलेखात झाडाच्या नोंदी अचूकपणे लिहाव्यात.
- शेतजमिनीत असणाऱ्या झाडांच्या नोंदी तलाठी यांनी गाव नमुना बाराच्या शेरा स्तंभामध्ये लिहाव्यात.
- आंबा, चिंच, फणस, नारळ, ताड, खजूर इत्यादी झाडांची नोंद गाव नमुना बारा सदरी फळझाडे म्हणून नोंदविण्यात येते.
- बाभूळ, निंब, खैर, धावडा व अंजन इत्यादी झाडांची नोंद गाव नमुना बारा सदरी इंधन उपयोगी झाडे म्हणून नोंदविण्यात येते.
- नवीन झाडे लावली असतील तर त्यांच्या नोंदी अभिलेखात तात्काळ लिहाव्यात.
- अव्वल कारकुनपेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास कोणत्याही जमिनीत जाऊन वृक्ष तपासण्याचा तसेच अनधिकृत झाडे तोडल्याचे आढळल्यास अशी तोडलेली झाडे जप्त करण्याचा अधिकार आहे. *(महाराष्ट्र वृक्षतोड व नियम कायदा १९६४, कलम ५(२))*
- जमीन हस्तांतरणाचे व्यवहार नोंदवितांना झाडांच्या हक्काबाबत काय व्यवहार झाला आहे याची नोंद न चुकता घ्यावी.
- पिक पहाणीच्या वेळेस अभिलेखातील झाडांची पडताळणी करावी. नवीन झाडे लावली असतील तर त्यांच्या नोंदी घ्याव्यात.



Dr. Sanjay Kundetkar. Dy. Collector

⭘ सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या झाड तोडणी परवानगीत नवीन झाडे लावण्याबाबत जो आदेश दिला असेल त्यानुसार झाडे लावलेली आहेत का याची तपासणी करावी.

⭘ नवीन वृक्ष लागवडीस उत्तेजन द्यावे.

⭘ रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांची तसेच नदी-नाल्याच्या किनाऱ्यावरील आणि रेल्वे कंपाऊंडच्या बाहेरील झाडे यांवर शासनाचा अधिकार असतो.

⭘ कोणत्याही पाण्याचा प्रवाह झरा किंवा तलाव याच्या किनाऱ्यापासून तीस मीटर अंतराच्या आत असलेले कोणतेही झाड पूर्व परवानगीशिवाय तोडता येत नाही.

⭘ शासनाचा अधिकार असलेली झाडे किंवा अशा झाडाचा कोणताही भाग अनधिकृतरित्या तोडणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २७ अन्वये दंडनिय अपराध आहे. असा दंड महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येतो.

☛ **वनांबाबत इतर माहिती:**

♦ झाडाचे वय सालीची अवस्था व चहूबाजूंनी फुटलेल्या नव्या फांद्यांवरुन तसेच खोडावरील वर्तुळांच्या संख्येरुन मोजतात. एक वर्तुळ म्हणजे एका मोसमात झालेली वाढ होय. झाडाचे वय मोजण्यासाठी **ऍक्झॅनोमीटर** वापरतात.

♦ **वनमिती** - वन प्रदेशाचे, वनातील झाडांचे मोजमाप करण्याच्या शास्त्राला वनमिती किंवा वनमापनशास्त्र असे म्हणतात. वनांचे क्षेत्रफळ, झाडांची उंची, आकारमान, वय, वाढीचा वेग इ. निश्चित ठरविणे हे या शास्त्राचे उद्दिष्ट असते.

♦ झाडांची उंची, डेंड्रोमीटर, डिप्सोमीटर, या उपकरणांनी मोजतात.

♦ झाडातील लाकडाचे आकारमान वा घनफळ हे लाकडाची लांबी व परिघ अथवा व्यास यांच्या मोजमापांवरून विशिष्ट सूत्रे वापरून ठरविता येते. अशी सूत्रे 'स्मेलियन सूत्र' व 'झूबर सूत्र' या नावांनी प्रचलित आहेत.

♦ **रेड डाटा बुक -** पृथ्वीवर अस्तित्वात असणारी जैवविविधता सुरक्षित रहावी. यासाठी कोणत्या प्रजाती, वनस्पती, झाडे आजमितीला सुरक्षित आहेत व कोणती धोक्यात आहेत हे शास्त्रीय निकष लावून नोंदण्याचे काम करण्याची प्रथा प्रथम 'इंटरनॅशनल युनियन फॉर कझर्वेशन ऑफ नेचर' किंवा 'आय.यू.सी.एन' या संस्थेने १९६४ साली सुरू केली. त्यांनी एक नोंद वही प्रथम छापली व त्याला 'रेड डाटा बुक' असे नाव दिले. लाल रंग रक्ताचा किंवा धोक्याचा निर्देशक आहे, म्हणून हे नाव दिले गेले.

♦ भारतात एकूण ४९००० वृक्षांच्या जाती आढळून येतात.

♦ पर्यावरणाच्या संतुलनासाठी ३३% भूभाग वनाखाली असणे आवश्यक आहे. (भारतात २०% भूभाग आहे.)

⭘ भारतीय वनांचे वर्गीकरण:-

**१. राखीव वने** (Reserved Forest)- यांना राष्ट्रीय संपत्ती मानले जाते. वृक्षतोड व चराई यावर कडक प्रतिबंध असतात.

**२. संरक्षित वने** (Protected forest)- यांत काही नियमांच्या आधारे लाकूड तोड व गुरे चराईला परवानगी असते.

**३. अवर्गीकृत वने** - यांत काही फी आकारून लाकूडतोड व गुरे चराईस पूर्ण स्वातंत्र्य असते.

**○ वनांचे प्रकार:-**

**१. उष्णकटिबंधीय ससाहरित वने**: वर्षभर समान तापमान व २०० सेमी पेक्षा जास्त पर्जन्याच्या प्रदेशात आढळतात. ही वने मिश्र असतात. पश्चिम घाटाचा पश्चिम उतार, आसाम, मेघालय, अंदमान निकोबार, प. बंगाल, ओरिसा इ. राज्यात ही जंगले आढळतात. हया वृक्षांचे लाकूड कठीण असते. उदा. महोगनी, रोजवूड, आयर्नवूड, रबर, आबनूस, एबोनी, सिंकोना, नारळ, ताड, बांबू इ.

**२. उष्णकटिबंधीय मोसमी पानझडी वने:** भारतात १०० ते २०० सेमी. पर्जन्य असणाऱ्या प्रदेशात मोठया प्रमाणावर ही वने आढळतात. या वनांना लवकर आग लागते. आर्थिक दृष्टया ही वने महत्वाची आहेत. या वनांत साग, साल, चंदन, शिसव, मोह, पळस, अर्जुन, खैर इ. वृक्ष आढळतात. उन्हाळयात ६ ते ८ आठवडे ही वृक्षे पाने गाळतात. प्रत्येक जातीच्या पानगळीची वेळ भिन्न असते. ही वने पश्चिम घाटाचा पूर्व उतार, पूर्व मध्यप्रदेश, द. बिहार, ओरिसा, शिवालिक टेकड्या, पूर्वघाट तसेच आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्रात चंद्रपुर, भंडारा, येथे आढळतात.

**३. काटेरी वने:** ८० सेमी. हून कमी पर्जन्य असणाऱ्या प्रदेशात ही वने आढळतात. सौराष्ट्र ते पंजाब, माळवा प्रांत, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्रात अहमदनगर, पुणे, सोलापूर, मराठवाडा इ. भागात आढळतात. या वृक्षांची मूळे खोल गेलेली असतात. यात बाभूळ, खजूर, निवडूंग, नागफणी इ. वृक्षे आढळतात.

**४. मँग्रोव्ह वने:** ही वने नदयांच्या त्रिभूज प्रदेशात आढळतात. या भागात सुंदरी वृक्षाचे प्रमाण अधिक असल्याने त्यास सुंद्री वने असेही म्हणतात. यात सुंद्री, चिप्पी, मारांडी, निपा, तिबर, उंडल इ. वृक्षे आढळतात. ही वने गोडया व खाऱ्या अशा दोन्ही पाण्यात वाढतात. यांचा सर्वाधिक विस्तार गंगा-ब्रह्मपुत्रेच्या त्रिभूज प्रदेशात आहे.

**५. पर्वतीय वने**:

अ) आर्द्रपर्वतीय वने: १००० ते २००० मी. पर्यत ही वने आढळतात. यात ओक, चेस्टनट, सफरचंद, ऐश, बीच ही वृक्षे आढळतात.

ब) समशीतोष्ण सूचिपर्णी वने: १६०० ते ३३०० मी. पर्यत ही वने आढळतात. बीच, चीड, सिडार, देवदार, स्प्रुस इ.वृक्ष आढळतात.

क) अल्फाईन वने: ३६०० मी. पेक्षा जास्त उंचीवर ही वने आढळतात. यात सिल्व्हर, चीड, बर्च, जुनिपर इ. वृक्ष आढळतात. यापेक्षाही अधिक उंचीवर गवताळ प्रदेश आढळतो.

**○ महाराष्ट्रातील वने:**

**१) उष्णकटिबंधीय सदाहरीत वने**: ही वने २०० सेमी. पेक्षा जास्त पर्जन्याच्या, जांभा मृदेच्या प्रदेशात आढळतात. यात नागचंपा, पांढरा सिडार, फणस, जांभूळ, कारवी, चंदन, नेचे, बांबू इ.वृक्ष आढळतात. ही अरण्ये सहयाद्रीचा घाटमाथा व सिंधुदुर्ग जिल्हयात सावंतवाडी तालुक्यात आढळतात.

**२) उष्णकटिबंधीय निमसदाहरीत अरण्ये:** वार्षिक १५० ते २०० सेमी पर्जन्य पडणा-या प्रदेशात ही वने आढळतात. ही पानझडी वने व सदाहरीत वने यांच्या संक्रमण अवस्थेत आढळतात. यात किंडळ, रानफणस, नान, कंदब, शिसम, बिबळा व काही प्रमाणात बांबू वृक्ष आढळतात. ही अरण्ये सहयाद्रीच्या पश्चिम उतारावर पायथ्याच्या भागात तसेच पुर्वेस खंडाळा, इगतपुरी इ. ठिकाणी आढळतात.

**३) उष्णकटिबंधीय आर्द्र पानझडी अरण्ये (मान्सून अरण्ये):** पानझडी अरण्ये १०० ते १५० सेमी पावसाच्या प्रदेशात सर्वत्र आढळतात. बाष्पाचे प्रमाण टिकविण्यासाठी ही झाडे आपली पाने गाळतात. या वनांत सागवान, घावडा, शिसम, तेंदू, पळस, बीजसाल, लेडी, आवळा, शिरीष, अंजन, खैर, या सारखे आर्थिक दृष्टया किफायतशीर वृक्ष आढळतात. यातील आर्द्र पाणझडी अरण्ये नागपूर, गडचिरोली या भागात तसेच मेळघाट, उत्तर कोकण, शंभू

Dr Sanjay Kundetkar, Dy. Collector

महादेव डोंगररांग, हरिश्चंद्र बालाघाट डोंगर, नाशिक, ठाणे, धुळे व नंदूरबार जिल्हयात आढळतात. महाराष्ट्रात सातपुडा पर्वत, अजिंठा डोंगर रांगांत, रूक्ष पानझडी अरण्ये आढळतात.

**४) उष्णकटिबंधीय काटेरी अरण्ये:** ८० सेमी पेक्षा कमी पर्जन्याच्या प्रदेशात आढळतात. ही अरण्ये मध्य महाराष्ट्रात पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर पूर्व भागात तसेच सोलापुर, मराठवाडा आणि विदर्भात टेकडयांवर आढळतात. ही वृक्ष अधूनमधून आढळतात. या भागात बाभूळ, बोर, खैर, हिवर, निंबासारखे झाडे आढळतात. या भागातील तारवड झुडपाचा उपयोग टॅनिन निर्मितीसाठी करतात.

**५) मॅग्रुव्ह जंगले:** कोकणात किनाऱ्यावर दलदलीच्या प्रदेशात व खाऱ्या जमिनीत ही वने आढळतात. यात चिपी, मारांडी, ही झुडपे, फक्त खाऱ्या जमिनीत वाढणारा तिस वृक्ष आढळतो. या वृक्षांचे लाकूड तेलयुक्त असल्याने त्यापासून होडया तयार करतात.

- महाराष्ट्राचे सर्वात मोठे राष्ट्रीय उद्यान - **चांदोली (३१७ चौ. कि.मी.)**
- महाराष्ट्रातील सर्वात लहान राष्ट्रीय उद्यान - **संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरीवली) (९० चौ. कि. मी.)**
- महाराष्ट्रातील सर्वात मोठे अभयारण्य - **माळढोक पक्षी अभयारण्य (अहमदनगर-सोलापूर) (८५०० चौ. कि.मी.)**
- महाराष्ट्रातील सर्वात लहान अभयारण्य - **देउळगाव - रेहेकुरी (अहमदनगर) (३ चौ. कि.मी.)**
- महाराष्ट्रातील पहिले पक्षी अभयारण्य - **कर्नाळा (रायगड)**
- महाराष्ट्रातून नाहिसे झालेले प्राणी - **चित्ता, चिंकारे व काळवीट**
- महाराष्ट्रातील मगर प्रजनन केंद्र - **ताडोबा**
- महाराष्ट्रातील सर्वात जुने अभयारण्य - **राधानगरी (१९१८)**
- महाराष्ट्रातील पहिले व देशातील ३ रे सागरी राष्ट्रीय उद्यान - **मालवण (सिंधुदुर्ग)**
- भारतातील सर्वात मोठे स्थालांतरित व स्थानिक पाणपक्षांसाठी राखीव अभयारण्य - **केवलादेव अभयारण्य**
- भारतातील पहिले व एकमेव मोर अभयारण्य - **नायगाव (बीड)**

**○ महाराष्ट्रातील वनशेती पध्दत:**

**१) कृषीवनरोपण** (Agri-silvi Culture): यामध्ये जमिनीच्या प्रकारानुसार व झाडांच्या उपयोगानुसार झाडे व पीके एकत्र घेतात. उदा - तटरक्षक झाडे, फळझाडे, लाकूड फाटा, यांच्या ओळीत पीके लावतात. वृक्ष + धान्य, भात+निलगीरी+ सुरू इ.

**२) वनिय कुरण** (Silvi Pastoral): हलक्या व उथळ जमिनीत चारा देणारे वृक्ष व कुरण उपयोगी गवताची लागवड करण्यात येते.

**३) कृषी वनिय कुरण** (Agri silvi Pastoral): हलक्या ते मध्यम जमिनीवर पीके, वृक्ष व गवताची लागवड करतात. उदा - नागली+ ऑस्ट्रेलियन बाभूळ+ स्टायलो इ.

**४) उदयान कुरण** (Horti Pastoral): हलक्या जमिनीत सिताफळ, बोर, आवळा व कवठ सारख्या कोरडवाहू फळांची लागवड करून मधल्या जागेत सुधारीत गवताची लागवड करतात.

**५) उदयान शेती** (Agro Horticulture): यात फळझाडांबरोबर धान्य पीके घेतात.

**६) कृषी उदयान कुरण** (Agri Horti pastoral): मध्यम प्रतिच्या जमिनीत फळझाडे, पिक व सुधारीत गवतांची लागवड करतात.

Dr. Sanjay Kundetkar. Dy. Collector

**<u>७) वृक्ष शेती पध्दत</u>** (Tree Farming): यात वृक्षांची दाट लागवड करतात. वृक्ष शेतीची मुळ संकल्पना १९२९ मध्ये जे. रसेल स्मिथ यांनी मांडली.

**<u>८) ऍले क्रॉपिंग</u>**: डोंगर उताराच्या टेकडयांवर उताराच्या दिशेने आडव्या रेषेवर गिरीपुष्प, शिवन, सुबाभूळ, या सारखे पिके घेतात.

Dr. Sanjay Kundetkar. Dy. Collector